कुंभी कासारी सहकारी बँक लि., कुडित्रे.

५० वा वार्षिक अहवाल

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

बँकेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, आपल्या बँकेची सन २०२५-२०२६ या वर्षाची ५० वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरूवार दि.२३.०७.२०२६ इ. रोजी दुपारी १.०० वाजता शेतकरी सांस्कृतिक भवन, कुंभी कासारी सहकारी साखर कारखाना परीसर कुडित्रे येथे आयोजित केली आहे. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी अगत्याने उपस्थित रहावे, ही विनंती.

**- सभेपुढील विषय -**

१) मागील दि.२६.०६.२०२५ इ.रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) सन २०२५-२०२६ सालाचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक यांची नोंद घेणे आणि त्यास मान्यता देणे.

३) संचालक मंडळाने सुचविलेल्या दि.३१.३.२०२६ अखेरचे नफा विभागणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.

४) सन २०२६-२०२७ चे अंदाजपत्रकास मंजुरी देणे व सन २०२५-२०२६ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.

५) वैधानिक लेखापरिक्षक **'मा. विश्राम कुलकर्णी ॲन्ड कंपनी चार्टर्ड अकौंटंटस्,(FRN- 139008W)'** इचलकरंजी यांचेकडून आलेल्या व अंतर्गत लेखापरिक्षक **'मा. एस्.आर.बकरे ॲन्ड कंपनी सी.ए. '** व कंकरंट लेखापरिक्षक **'मा. मंदार एम्. धर्माधिकारी चार्टर्ड अकौंटंट'** यांचेकडून आलेल्या सन २०२५-२०२६ सालचे हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेणे.

६) सन् २०२७-२०२८ सालासाठी अंतर्गत लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.

७) सन् २०२६-२०२७ सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षकांचे नेमणूकीबाबत मा. संचालक मंडळाने शिफारस केलेनुसार रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचे निकषास अधिन राहून नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.

८) एकरकमी परतफेड/ आदी योजने अंतर्गत सवलत देणेत आलेल्या कर्जांची नोंद घेवून त्यास मंजुरी देणे.

९) तांत्रिकदृष्ट्या निर्लेखीत (Technically Write off) करावयाच्या एन्.पी.ए.खात्यांना मान्यता देणे.

१०) संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

११) संचालक मंडळाने सुचविलेल्या कर्मचारी आराखड्यास् (Staffing Pattern) मंजूरी देणे.

१२) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरूस्तीस मंजूरी देणे.

१३) बँकेचा लाँग टर्म परस्पेक्टीव्ह प्लॅन व वार्षिक कार्यवाहीचा अहवालास मान्यता देणे व सन् २०२६-२७ सालाकरिता बाहेरील कर्जे व ठेव उभारणीची मर्यादा ठरविणे.

१४) बँकेच्या मुख्यालय कुडित्रेच्या झालेल्या नुतणीकरण खर्चास मंजूरी देणे.

१५)शाखा संभाजीनगर कोल्हापूर, बालिंगा व आसुर्ले-पोर्लेसाठी बांधकाम व अंतर्गत सजावट कामाच्या झालेल्या खर्चाची नोंद घेणे.

१६)बँकेचा सुवर्णमहोत्सव साजरा करणे व येणाऱ्या अनुशंगिक खर्चास मान्यता देणे.

१७) पुढील सालासाठी सभासद शिक्षण व प्रशिक्षण आराखडा तयार करणे.

१८)या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.

१९)मा.अध्यक्षांचे परवानगीने आयत्यावेळी आलेल्या विषयांचा विचार करणे.

मा.संचालक मंडळाचे आदेशावरून

स्थळ - कुडित्रे .

दिनांक- ०९.०६.२०२६

डी.एस्.राऊत,
मुख्य कार्यकारी अधिकारी.

अजित श. नरके.
अध्यक्ष.

KUMBHI KASARI SAHAKARI BANK HEAD OFFICE KUDITRE

## -विशेष सूचना-

१) सभासदांनी वार्षिक साधारण सभेमध्ये नोटीसीसंबंधी सुचना करावयाची असल्यास दि. १६.०७.२०२६ पर्यंत ऑफिस वेळेत लेखी स्वरूपात द्याव्यात

२)बँकेच्या एका शेअर्सची दर्शनी किंमत रू.१००/-असून ज्या सभासदांचे भाग रू.१००/-च्या पटीत नाहीत किंवा रू.१००/-पेक्षा कमी आहेत त्यांनी कमी असणारी रक्कम सत्वर भरावी.

३) ज्या सभासदांनी वारस नोंद दिलेली नाही त्यांनी वारस नोंद द्यावी तसेच ज्या सभासद ठेवीदारांनी अद्याप के.वाय. सी. पुर्तता दिलेली नाही त्यांनी सुलभ व्यवहारासाठी सत्वर पुर्तता करणेत यावी.

४) प्रधान कार्यालय व सर्व शाखांमध्ये ताळेबंद, नफातोटा पत्रके व अंदाजपत्रक ची प्रत उपलब्ध आहे.

५)सुधारित पोटनियमानुसार ' क्रियाशील सभासदत्व' पात्रतेसाठी रू. ५००/- चे भाग व अगोदरच्या पाच वर्षात किमान रू. १०००/- ची ठेव किंवा रू.२५,०००/- चे कर्ज घेणे आवश्यक आहे.व सदर सभेस पाच वर्षातून एकदा हजर राहणे बंधनकारक आहे अन्यथा सदर सभासद संचालक मंडळाच्या निवडणूकीसाठी मतदान करणेस पात्र ठरणार नाही .

६)संचालक मंडळ सदस्यासाठीची पात्रता निकष:- किमान रू. २०००/- चे भाग व रू.५०,०००/- ची ठेव ठेवणे व क्रियाशील सदस्य असणे आवश्यक आहे.

KUMBHI KASARI SAHAKARI BANK LTD. HEAD OFFICE KUDITRE

कुंभी कासारी सहकारी बँक लि., कुडित्रे करिता

मुख्य कार्यकारी अधिकारी

संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरूस्तीचा मसुदा.

| सद्याचा पोटनियम क्र. | पोटनियमातील मुळ शब्दरचना | दुरूस्त पोटनियम क्र | पोटनियमात दुरूस्ती केलेली शब्दरचना | दुरूस्तीचे कारण |
|---|---|---|---|---|
| ८ | **भागभांडवल :-** बँकेचे अधिकृत भाग भांडवल रू.५,००,००,०००/-(रु. पाच कोटी फक्त.) असून भागाची दर्शनी किंमत रू.१००/-राहील.भाग भांडवल ५,००,०००/- भागात विभागलेले असेल. | ८ | **भागभांडवल :-** बँकेचे अधिकृत भाग भांडवल रू.१०,००,००,०००/-(रू. दहा कोटी फक्त )असून भागाची दर्शनी किंमत रू.१००/-राहील. भाग भांडवल १०,००,०००/- भागात विभागलेले असेल. | वाढत्या व्यवसायाचे पटीत भांडवल पर्याप्त प्रमाणात वाढ होणेकरिता. |

KUMBHI KASARI SAHAKARI BANK LTD. HEAD OFFICE KUDITRE

डी.एस्.राऊत
(मुख्य कार्यकारी अधिकारी)